दाखल तारीख : ०६.०७.२०१८
नोंदविला तारीख : ०६.०७.२०१८
निकाल तारीख : १८.०८.२०२१
कालावधी : व म दि
०३ ०१ १२

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,(न्यायालय क्र. ६) चंद्रपुर, यांचे न्यायालयात
## (पिठासिन अधिकारी कु. स्नेहा रा. जाधव)

नियमीत फौजदारी खटला क्र. २७५/२०१८ नि. क्र. २५

**CNR No. MHCH 03-003068-2018**

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस स्टेशन अधिकारी
पोलीस स्टेशन रामनगर
त. जि. चंद्रपुर ... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. कुनाल मनिष कातकर
वयः २३ वर्षे, व्यवसायः मजुरी
रा. बाबुपेठ वार्ड, चंद्रपुर

२. संजय रामलखन घुघुवा
वयः २६ वर्षे, व्यवसायः मजुरी
रा. रयतवारी कॉलरी, तेलगु शाळेजवळ, चंद्रपुर .... **आरोपी**

.....................................................................................................

**दोषारोप** भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये

.....................................................................................................

**काम पाहिले** अभियोग पक्षा तर्फे विद्वान सहा सरकारी वकिल श्री. बोहरा साहेब
आरोपीं तर्फे विद्वान वकिल टेंभरे मॅडम

.....................................................................................................

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक १८ ऑगस्ट २०२१)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे ३७९ सहकलम ३४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक २४.०४.२०१८ रोजी रात्री ०२.०० वाजता फिर्यादीने दुकानाकडे जाउन पाहिले असता एक इसम त्यांच्या वर्कशॉप मधील वेल्डींगचे केबल वायर (तांब्याचे) घेउन जात असताना दिसला. दिनांक २५.०४.२०१८ रोजी त्यांनी वर्कशॉप मध्ये सीसीटीव्ही कॅमेरा लावला. तेव्हा रात्री १.०० ते १.३० वाजता परत वर्कशॉपमध्ये जाउन सीसीटीव्ही कॅमे–याची तपासणी केली असता एक इसम लोखंडी चॅानल नेताना दिसला. दिनांक २६.०४.२०१८ रोजी रात्री १२.०० ते १.०० वाजता दरम्यान फिर्यादी वर्कशॉपकडे गेले असता दोन इसम वर्कशॉपच्या आतमध्ये फिरताना दिसले. आरोपींनी वर्कशॉप मधुन ४ नग १२ फुट लांबीचे लोखंडी चॅानल, लोखंडी प्लेटचे तुकडे, तांब्याचा केबल वायर १०० फुट लांब, इलेक्ट्रीक वायर १५० फुट लांब व इलेक्ट्रीक बोर्ड असा एकुण ३२,०००/– रुपयांचा माल चोरुन नेला.

३. पोलीसांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्र. ३६५/२०१८, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासी अधिका–यांनी घटनास्थळ व मेमोरंडम जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदाराचे बयान नोंदविले व तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९

सहकलम ३४ अन्वये नि.क्र. १८ वर दोषारोप निश्चीत करण्यात आले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावुन सांगितला. त्यांनी गुन्हा नाकबुल केला. आरोपींविरुध्द पुरावा आला नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ (१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

५. अभियोग पक्षाचे कथन, अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा व दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे माझ्या विचारार्थी उपस्थीत होतात. त्यांचे कारणासह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २४.०४.२०१८ ते २६.०४.२०१८ दरम्यान किशोर वर्कशॉप, इंडस्ट्रीअल एरिया, चंद्रपुर येथे आरोपींनी संगणमताने फिर्यादीच्या मालकीचे लोखंडी चॉनल, लोखंडी प्लेट, तांब्याचा केबल वायर आणि इलेक्ट्रीक वायर त्यांच्या संमत्ती शिवाय चोरुन नेली ? | नकारार्थी |
| २ | काय आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुददा क्र. १ व २ करीता

६. आरोपींच्या विरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने सा. क्र. १ गणपत नारायण मानेकर, फिर्यादी यांना नि.क्र. २३ प्रमाणे तपासले.

७. फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही . त्यांनी

आरोपींविरुध्द केस पुढे चालवायची नाही असे सांगितले. अभियोग पक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे ३७९ सहकलम ३४ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुददा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करुन मुददा क्र. २ बाबत खालील आदेश करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

1. आरोपी कुनाल मनिष कातकर आणि संजय रामलखन घुघुवा यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे ३७९ सहकलम ३४ नुसार च्या आरोपातुन, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामिनपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३ जप्त मुद्देमाल लोखंडी चॉनल किंमत अंदाजे रुपये १५,०००/-, लोखंडी प्लेटचे तुकडे किंमत अंदाजे रुपये ३,०००/-, तांब्याचा केबल वायर किंमत अंदाजे रुपये १०,०००/-, इलेक्ट्रीक वायर किंमत अंदाजे रुपये ४,०००/- हे अपील कालावधीनंतर मुळ मालकास कागदपत्रांची पडताळणी करुन परत करण्यात यावी. तसेच सहा महिण्यांच्या आत कुणीही न आल्यास सदर मुद्देमाल नियमांनुसार विल्हेवाट लावण्याकरीता सरकार जमा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

स्वा/-

(कु. स्नेहा रा. जाधव)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायालय क्र. ६)चंद्रपुर

दिनांक १८.०३.२०२१